# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०—२५६२११८१
२५६२११८२
Email :- dyrelg@unipune.ac.in

शैक्षणिक पात्रता विभाग
गणेशखिंड,
पुणे—४११ ००७

## परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांना इतर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात प्रवेश घ्यावयाचा असल्यास प्रवजन प्रमाणपत्र (Migration Certificate) काढावे लागते. सदरचे प्रवजन प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज प्रक्रिया ही यापूर्वीच ऑनलाईन पध्दतीने करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी नाशिक जिल्हयातील महाविद्यालये/परिसंस्थांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना नाशिक उपपरिसर येथून आणि अहिल्यानगर जिल्हयातील महाविद्यालये/परिसंस्थांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना अहिल्यानगर उपपरिसर येथून त्याचप्रमाणे पुणे जिल्हयातील महाविद्यालये परिसंस्थांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ मुख्यालयातून प्रवजन प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येतात.

प्रवजन प्रमाणपत्र मिळण्यासाठी विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतो. अर्जासोबत विद्यार्थ्यांना 'प्रवजन प्रमाणपत्राकरिता स्थलांतर दाखला' (T.C. For Migration) आणि अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेची (Last Year's Marks Statement) प्रत अपलोड करावे लागते. विद्यार्थ्यांकडून अर्ज पूर्ण भरून झाल्यावर सदर अर्ज संबंधित महाविद्यालयाच्या लॉगीनमध्ये उपलब्ध होतो. संबंधित महाविद्यालयाने उक्त अर्ज ऑनलाईन पध्दतीने मंजूर (Approve) केल्यानंतर तो विद्यापीठाच्या लॉगीन मध्ये येतो. प्रवजन प्रमाणपत्र (Migration Certificate) विद्यार्थ्यांना पुरविणे ही महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित सेवा असल्याने विहित वेळेत सदर प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना निर्गमित करणे आवश्यक आहे.

परंतु विद्यापीठाच्या असे निदर्शनास आले आहे की, विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये प्राप्त अर्ज महाविद्यालये/परिसंस्थांकडून विहित वेळेत मंजूर (Approve) केले जात नाहीत. तसेच विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जाची कोणतीही छाननी केली जात नाही. त्यामुळे विद्यापीठाच्या पातळीवरून विद्यार्थ्यांना अर्जामध्ये त्रुटी असल्यास कळवाव्या लागतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवजन प्रमाणपत्र निर्गमित करण्यात विनाकारण वेळ लागतो.

सबब, या परिपत्रकानव्ये सर्व मा. विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग/मा. प्राचार्य, संलग्न महाविद्यालये/मा. संचालक सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रवजन प्रमाणपत्रासाठी त्यांच्या लॉगीन मध्ये प्राप्त होणारे अर्ज जास्तीत जास्त तीन कार्य दिवसात काळजीपूर्वक छाननी करून परिपूर्ण अर्ज मंजूर (Approve) करावेत. त्रुटी असलेल्या अर्जा मधील त्रुटी आपल्या स्तरावरुन संबंधित विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घ्याव्यात.

गणेशखिंड, पुणे— ४११००७ )
जा.क्र. शै.पा./314 )
दिनांक :09 डिसेंबर, २०२५ )

Rasve 11/12/2025
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

प्रत :
१. मा. विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये
३. मा. संचालक, सर्व मान्यता प्राप्त परिसंस्था